महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४००००१

दूरध्वनी क्र: ०२२-२२०१३५७८ Email ID : soyojana११.rdd-mh@nic.in

क्रमांक-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२ /यो-११ दिनांक :- ११ सप्टेंबर, २०२५

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,(सर्व)

**विषय-** **मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची पुर्वतयारी, प्रचार प्रसिद्धी, शुभारंभ व शुभारंभ कार्यक्रमाच्या प्रक्षेपणाबाबत.**

**संदर्भ-** १. ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र:-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२(E-११२३०५७)/यो-११ दि.०६ ऑगस्ट, २०२५.
२. शासनाचे समक्रमांकित पत्र दि.०७.०८.२०२५

महोदय,

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" या शासनाच्या महत्त्वाकांक्षी अभियानास, संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली असुन अभियानाचा शुभारंभ दि.१७.०९.२०२५ रोजी करण्यात येणार आहे. यासंदर्भात मा.मंत्री (ग्रामविकास) यांनी दि.०८ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या व्ही.सी. मध्ये सविस्तर मार्गदर्शन केलेले आहे. सदर अभियानाच्या शुभारंभापूर्वी व अभियान यशस्वी होण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

## १. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या पुर्वतयारी बाबत :-

संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये, ग्रामस्तरीय कार्यशाळेचे आयोजन दि.०६.०९.२०२५ ते दि.१०.०९.२०२५ या दरम्यान करून विशेष ग्रामसभेमध्ये सविस्तर माहिती देवून जनसमुदायास प्रेरित करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, ग्रामपंचायत स्तरावर अभियानाच्या पुर्व तयारीसाठी, प्रचार प्रसिध्दीसाठी तसेच वातावरण निर्मितीसाठी ग्रामसभेचे आयोजन **दि.११.०९.२०२५ ते दि.१४.०९.२०२५** या कालावधीत करण्यात यावे. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता ग्रामसभेचे प्रभावी नियोजन करावे.

## २. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या प्रचार प्रसिद्धीबाबत :-

- दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, जिल्हास्तरावर व गट विकास अधिकारी यांनी, पंचायत समिती स्तरावर पत्रकार परिषद व युट्यूब व इन्स्टाग्रामवर प्रसिद्ध, सक्रीय व्यक्तींसोबत बैठक घेऊन त्यामध्ये अभियानाच्या शुभारंभाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

- जिल्हा परिषद स्तरावर व पंचायतसमिती स्तरावर प्रचार प्रसिद्धीसाठी स्वतंत्र कक्ष (War Room) तयार करावा. या कक्षामध्ये अभियानाच्या प्रचार प्रसिद्धीसाठी जिल्हा परिषद स्तरावर २ व्यक्ती व पंचायत समिती स्तरावर १ व्यक्तीची नेमणूक करावी.
- जिल्हास्तरावरील एका विभाग प्रमुखाची प्रत्येक तालुक्यासाठी संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. तसेच पंचायत समिती स्तरावरील तालुकास्तरीय विभाग प्रमुखाची प्रत्येकी २० गावासाठी नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी.
- दि.१७ सप्टेंबर, २०२५ रोजी होणाऱ्या अभियानाच्या शुभारंभाची जाहिर प्रचार व प्रसिद्धी करण्यात यावी. अभियानाच्या शुभारंभाच्या ३ दिवस आधी जिल्हा, तालुका व गावातील मोक्याच्या व सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्स लावण्यात यावेत. कलापथक तयार करण्यात यावे. शाळेच्या मुलांना (शाळेच्या वेळेनंतर) सहभागी करून प्रभातफेरी काढण्यात यावी.
- प्रत्येक जिल्हा परिषदेने एक चित्ररथ तयार करून जिल्ह्यामध्ये अभियानाचा प्रचार करावा.

## ३. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या शुभारंभाबाबत :-

- **या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दि.१७.०९.२०२५ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे.**
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अभियानाच्या जिल्हास्तरीय शुभारंभासाठी मा.पालकमंत्र्यांशी चर्चा करून, जिल्ह्यातील एक गाव निश्चित करुन जिल्हास्तरीय शुभारंभाचे सविस्तर नियोजन करावे.
- गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी मा. स्थानिक आमदार यांच्याशी चर्चा करून, तालुकास्तरावर त्यांच्या हस्ते शुभारंभासाठी तालुक्यातील एक गाव निश्चित करुन तालुकास्तरीय शुभारंभाचे नियोजन करावे.
- विभागीय आयुक्तांनी विभागातील एका गावामध्ये शुभारंभास उपस्थित राहावे अशा गावाची शुभारंभाची पुर्व तयारी संबधित जिल्हा परिषद यांनी करावी.
- शुभारंभाच्या ग्रामसभेसाठी १ हजार लोकसंख्यमागे किमान २५० ते ३०० या प्रमाणात ग्रामपंचायातीची लोकसंख्या विचारात घेऊन अपेक्षित उपस्थिती सुनिश्चित करावी. ग्रामसभेमध्ये प्रतिष्ठित व्यक्ती, अधिकारी, वकील, डॉक्टर, पत्रकार, व्यावसायिकांना निमंत्रित करावे तसेच त्यांचा यथोचित सन्मान करावा. तसेच गावातील महिला बचत गट, शिक्षक, जिल्हा परिषद कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, ग्रामस्तरीय सर्व शासकीय कर्मचारी, पोलीस पाटील, कोतवाल, युवक, भजनी मंडळ, युट्यूब व इन्स्टाग्रामवर प्रसिद्ध व सक्रीय कार्यकर्ते अशा सर्व घटकांना सामावून घ्यावे. तसेच शासनाचे विविध योजनांचे लाभार्थी ग्रामसभेस उपस्थित राहातील अशी व्यवस्था करावी. या ग्रामसभेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात यावे.
- तालुका स्तरावरील पंचायत समितीच्या सर्व विभागाकडील विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, कृषि अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, आरोग्य पर्यवेक्षक व अन्य क्षेत्रिय अधिकाऱ्यांची प्रत्येक गावासाठी संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.

## ४. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या शुभारंभ कार्यक्रमाच्या प्रक्षेपणाबाबत:-

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या प्रमुख उपस्थितीतील दि.१७.०९.२०२५ रोजीच्या शुभारंभ कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण युट्यूब व इतर आवश्यक चॅनलद्वारे करावयाचे आहे. राज्यातील सर्व सबंधित गावाच्या ग्रामसभेमधून, राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रमामध्ये ऑनलाईन सहभागी होता येईल, यासाठी ग्रामपंचायत स्तरावर स्क्रीन व प्रोजेक्टरची व्यवस्था करावी, जेणेकरून ग्रामसभेस उपस्थितांना राज्यस्तरीय शुभारंभाचे लाईव्ह प्रक्षेपण पाहता येईल व कार्यक्रमामध्ये सहभागी होता येईल. याबाबतची आवश्यक कार्यवाही ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायत अधिकारी यांनी करावी व सर्व ग्रामपंचायतीने अशी व्यवस्था केल्याची खात्री संबधित गटविकास अधिकारी यांनी करावी. ज्या ग्रामपंचायती मध्ये अशी व्यवस्था केली जाणार नाही, याची राज्यस्तरावरुन गंभीर दखल घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अशाप्रकारे अभियानाची सुरूवात यशस्वी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

आपला,

(सागर मनोरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती यो-११.